**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०२/२०१६-१७/१०१ दिनांक:०५-०८-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. ०२/२०१६-२०१७**

श्री डॉ. भास्कर श्रीपाद दिवाण,
दिवाण निकेतन ३१३ राधाकृष्ण वसाहत
जिल्हा सांगली.
**तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग, सांगली

३) अतिरिक्त. कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
दक्षिण उपविभाग सांगली

**विरुध्द पक्षकार**

**कोरमः-** १. श्री वि. श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. प्र. वि.खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी, अध्यक्ष ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) विद्युत देयकांमधील नमूद केलेल्या स्थिर आकारावर(Fixed charges) वीज शुल्क (Electricity Duty) आकारण्याचा वितरण कंपनीस कायद्यानुसार अधिकार नाही अशी तक्रार घेऊन वीज ग्राहक - तक्रारदार श्री डॉ. भास्कर श्रीपाद दिवाण रा. सांगली हे या मंचासमोर आले आहेत. त्यांचे नावे घरगुती, कृषि व वाणिज्य अशी एकूण आठ विद्युत कनेक्शन आहेत.त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वितरण कंपनी ही वीज शुल्क केवळ प्रत्यक्ष वीज वापराच्या शुल्कावर (Consumption charges) आकारु शकते.महाराष्ट्र विद्युत शुल्क कायदा १९५८ च्या संबंधित तरतूदींचा चुकीचा अर्थ काढून वितरण कंपनी ब-याच काळा पासून स्थिर आकारावर विद्युत शुल्क आकारत आली आहे. जेव्हा ग्राहकाकडून विज वापर होत नाही तेव्हा वीज शुल्क आकारणेत येत नाही ही बाब वितरण कंपनीतर्फे मान्य केली आहे. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने तक्रारदारांची याबाबतची तक्रार दिनांक १५-०३-२०१६ च्या आदेशाने रद्द केल्यामुळे त्यांना या मंचासमोर येणे भाग पडले आहे. त्यांची अशी विनंती आहे की, वितरण कंपनीने स्थिर आकारावर विज शुल्क अकारु नये असा आदेश करुन पूर्वी अशी केलेली वसूली सव्याज परत देण्याचा आदेश व्हावा.

२) वि.प. - वितरण कंपनीतर्फे लेखी निवेदन देण्यात आले आहे. त्यांचे असे कथन आहे की, विद्युत नियामक आयोग विनियम २००६ परिच्छेद ६.१ व कलम ६१ व ६२ प्रमाणे वितरण कंपनीस ग्राहकांचे वीज दर आकारणी ठरविण्याचे अधिकार देणेत आले आहेत. मा. आयोगाच्या मंजूरीनुसार वीजेची आकारणी केली जाते. त्यामध्ये स्थिर/मागणी (Fixed/Demand charges) आकारण्याचा समावेश आहे. परंतु ग्राहकाकडून वीजेचा वापर झाला नसल्यास फक्त स्थिर आकार घेतला जातो व त्यावर वीज शुल्क आकारले जात नाही. त्यामुळे केली जात असलेली वीज आकारणी बरोबर आहे असे वि.प. यांचे म्हणणे आहे.

३) सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक १२-०७-२०१६ रोजी या मंचासमोर घेणेत आली.त्यावेळी तक्रारदार स्वतः उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या तक्रारीस अनुसरुन सविस्तर तोंडी युक्तिवाद केला. त्यापूर्वी दि. २४-०५-२०१६ रोजी त्यांनी त्यांचा लेखी युक्तिवादही दाखल केला आहे.

याऊलट दि. १२-०७-२०१६ रोजी कोल्हापूर व सांगली या जिल्हयात जोरदार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाल्यामुळे वि.प. तर्फे कोणीही सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत.

उपलब्ध सर्व कागदपत्रे व तक्रारदार यांच्या युक्तिवादाचा सखोलपणे विचार करणेत आला आहे.वि.प. यांचे लेखी म्हणणे सुध्दा विचारात घेणेत आले आहे.

४) वरील विवेचना वरुन या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) वितरण कंपनी स्थिर आकारावर करीत असलेली वीज, शुल्काची आकारणी नियमबाहय व बेकायदेशीर आहे का?

उत्तरः- नाही

२) तक्रारदार हे या कामी कोणतीही दाद मिळणेस पात्र आहेत का?

उत्तरः- नाही

३) कोणता अंतिम आदेश ?

उत्तरः- खालील प्रमाणे

## कारणमिमांसा

५) महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम १९५८ कलम ३ व ४ नुसार विद्युत शुल्काची आकारणी करण्यात येते. अशी वीज शुल्काची आकारणी संबंधीत ग्राहकाने प्रत्यक्ष वापर केलेच्या वीजेवर करावी असेही नमूद केले आहे. सदर कायद्याच्या कलम २(अअ) मध्ये (Consumption charges ) याची व्याख्या खालील प्रमाणे नमूद केली आहे.

**"Consumption charges**

((aa) " consumption charges " means the charges levied by the licensee,under the Elelectricity (Supply) Act, १९४८, for the energy consumed by a consumer which charges shall include the energy charges, maximum demand charges, fuel adjustment charges and fuel cost adjustment;)

म्हणजे प्रत्यक्ष वीज वापर आकारामध्ये (Consumption charges ) वीज आकार, कमाल मागणी आकार, इंधन समायोजन आकार वगैरे चार बाबींचा समावेश होतो.

६) केस क्र.१२१/२०१४ मधील २०१३-१४ ते २०१५-१६ या कालावधीकरिता मा. विद्युत नियामक आयोगाने महावितरणसाठी पारीत केलेल्या एम. वाय.टी आदेशातील खालील परिच्छेंदाचा या ठिकाणी उल्लेख करणे योग्य होईल असे वाटते:

**Commission's Ruling**

६.७.४ The commission, in its Order in Case No.७२ of २००९ had reduced the Fixed /Demand Charges on account of high power deficit in MSEDCL's area.

६.७.५ During the public consultation process, many consumers have strongly opposed the proposal of MSEDCL to increase Fixed/Demand Charges. However, it should be noted that the approved expenses of MSEDCL need to be recovered through the tariff, by way of Fixed charges or Energy Charges or both. Therefore, not increasing the Fixed Chargees will result in a corresponding impact on Energy Charges.

६.७.६ With regard to the levy of Fixed Charges / Demand Charges, the commission has explained the rationale for the same in previous Tariff Orders. This is also in accordance with the EA, २००३ and the Tariff Policy notified by the Mop, GoI. At present, the Fixed Costs constitute around ५४% of the ARR of MSEDCL, whereas revenue recovery thorugh Fixed Charges consititutes around १४.६ % of the total revenue. Levy of Fixed Charges and Demand Charges do not result in any windfall gain to MSEDCL, since it is recovering only a part of the Fixed Costs through such Charges. With the proposed increase, revenue recovery from Fixed Charges would increase to only around १६.८% of total revenue. As rationalization of Energy Charges has also been undertaken simultaneously, the proposed rationalization in Fixed Charges is unlikely to result in a significant tariff burden for consumers.

वरील आदेशातील, स्थिर आकार आणि मागणी आकार हे शब्द मा. आयोगाने साधारणत: समानार्थी वापरले आहेत असे या मंचाचे अनुमान आहे. मागणी आकार म्हणजे कमाल मागणी आकार (Maximum Demand Charges ) असा स्पष्ट अर्थ काढता येत आहे. मा.आयोगाच्या ऊपरोक्त आदेशातील परिच्छेद २.२१.१८ व २.२१.६ या मध्येही Fixed /Demand charges हे शब्द साधारणपणे एकाच अर्थाने वापरले आहेत असे या मंचाचे मत आहे.

७) मा. विद्युत आयोगाच्या आदेशातील खालील निर्देश येथे नमूद करणे योग्य होईल.

३.४.४. The Charges for electricity supplied under this Regulation ३.४ may include a fixed charge in addition to a charge for actual electricity supplied, in accordance with terms and conditions of tariff as may be specified.

८) सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, वरील आदेशाप्रमाणे, प्रत्यक्ष वीज वापराच्या आकारात स्थिर आकाराचा समावेश करता येतो. असेही आढळून येते की , जेव्हा ग्राहकाकडून वीजेचा वापर होतो, तेव्हा प्रत्यक्ष वीज वापर आकार, स्थिर आकार व इंधन समायोजन खर्च या सर्वावर वीज शुल्काची आकारणी केली जाते. ही बाब खरी आहे की, तक्रारदार यांच्या मे-२०१५ च्या वीज देयकात (वीज वापर झाला नसल्याने ) वीज शुल्क आकारलेले नाही . तथापि एवढीच बाब, तक्रारदारांचे म्हणणे ग्राहय मानण्यास पुरेशी नाही. मा. विद्युत नियामक आयोगाने ऊपरोक्त परिच्छेद ३.४.४ मध्ये मंजूरी दिल्या प्रमाणेच स्थिर आकार अंतर्भूत करुन वीज वापर आकारणीवर वीज शुल्क आकारले जाते ही बाब स्पष्ट होत आहे.त्यामध्ये या मंचाने हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही.

९) जरी महावितरण कंपनी ५४ % फिक्स्ड व कॉस्टपैकी (Fixed Cost )१४% एवढा भाग स्थिर आकारातून वसूल करीत असली तरी त्या कारणावरुन वर सविस्तर नमूद केलेल्या कारणांस्तव, तक्रारदार यांची तक्रार मान्य करणे शक्य होत नाही. मा. विद्युत आयोगाने एकदा, प्रत्यक्ष वीज वापराच्या आकारामध्ये स्थिर आकाराचा समावेश होतो असे नमूद केल्यानंतर, स्थिर आकारावर वीज शुल्क आकारणे नियमबाहय होईल हा युक्तिवाद मान्य करता येत नाही.

१०) विद्वान तक्रारदार यांचे असेही निवेदन या संदर्भात मंचासमोर आले की, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम १९५८ मधील तरतूदींचा विरोधात, मा. विद्युत नियामक आयोग परिच्छेद ३.४.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आदेश पारित करु शकत नाही. तथापि हा युक्तिवाद स्विकारार्ह नाही.माझ्या मते, स्थिर आकार आणि कमाल मागणी आकार यामध्ये शब्द बदलाखेरिज फारसा फरक नाही. त्यामुळे प्रत्यक्ष वीज वापर आकारात स्थिर आकाराचा समावेश होतो किंवा होऊ शकतो. तसेच,मा. विद्युत नियामक आयोगाच्या अधिकार क्षेत्राची वैधता या मंचाने तपासणे योग्य होणार नाही. मा. आयोगास दरपत्रक ठरविणेचे अधिकार विद्युत कायदा २००३ च्या कलम ६१ ते ६३ मध्ये प्रदान करण्यात आले आहेत.

११) ऊपरोक्त, या न्याय निर्णयातील परिच्छेद-६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे , स्थिर आकार आणि कमाल मागणी आकार यामध्ये मूलभूत फरक आहे असे जरी मानले तरी त्या बाबीचा या प्रकरणावर परिणाम होत नाही. याचे कारण ,मा. विद्युत नियामक आयोगाने त्यांच्या ऊपरोक्त परिदच्छेद ३.४.४ मधील आदेशामध्ये प्रत्यक्ष वीज वापराच्या आकारामध्ये स्थिर आकाराचा समावेश होतो/होऊ शकतो असे नमूद केले आहे.

१२) वरील सर्व कारणास्तव, या प्रकरणातील सन्माननीय तक्रारदार यांचा तक्रार अर्ज रद्द होणेस पात्र आहे. तक्रारदार यांना त्यांनी मागितलेली कोणतीही दाद हा मंच देऊ शकत नाही. सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१. ग्राहक तक्रारदार श्री डॉ. भास्कर श्रीपाद दिवाण यांची या मंचाकडील तक्रार नामंजूर करणेत येत आहे.
२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| (वि. श. गुळवणी) | (पी.व्ही. खपली) | (श्री पी. एस. बुरांडे) |
| अध्यक्ष | सदस्य सचिव | ग्राहक सदस्य |